**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांचे कार्यालय**
"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३

सत्यमेव जयते

महाराष्ट्र वन विभाग
Office - 0231/2653632,
E-mail ID –
ccftkolhapur@mahaoforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

---

क्रमांक कक्ष-६/नोसेल/WRSR/ट्रा.लाईन/२५-२६/2671
कोल्हापूर -४१६००३ दिनांक - १४/०१/२०२६.

**विषय :-** Proposal Under VAN (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980, for Construction of 765 kV Double Circuit Transmission Line from 765/400 kV Narendra (New) S/S to 765/400 kv Pune S/S for Transmission system for ISTS Network Expansion scheme in Western Region & Southern Region for export of surplus power during high RE scenario in Southern Region, by WRSR Power Transmission Limited. (Area - 77.2842 ha.) (Online Proposal No. FP/MH/PWR_TRANS/ 473651/ 2024)

**संदर्भ:-** १. केंद्र शासन पत्र FP/MH/PWR/Trans/473651/2024, दिनांक १७.१२.२०२४
२. उपवनसंरक्षक सांगली यांचेकडील पत्र क्र.अ/कक्ष-६/जमीन/२०२५-२६/३७३७, दिनांक १२.०१.२०२६

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ अन्वये वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने सदर प्रस्तावास १ ते २५ अटींचे अधीन राहून तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाचे पत्रातील अट क्र.१.२, १.३,१.६, ३.१ व ३.२ चे अनुषंगाने सर्व्हे सीमांकन, पर्यायी वनीकरण, नक्त वर्तमान मूल्य, औषधी वनस्पतीचे रोपवण, वन्यजीव संवर्धन आराखडा ई. बाबी करीता रक्कम रु. ३०,६९,८८,१६८/- विहित मार्गे कॅम्पा सदरी जमा केलेली आहे असे संदर्भ क्र.२ अन्वये उपवनसंरक्षक सांगली यांनी या कार्यालयास कळविले आहे.

केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. एफ-११/३०६-२०१४/एफसी, दिनांक ७.०५.२०१५ व महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्रक्र-७७/फ-१०, दिनांक १.०७.२०१५ तसेच वन (संरक्षण एव संवर्धन) नियम, २०२३ अन्वये वन (संरक्षण एव संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत नवीन रस्ते करणे, अस्तीत्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाइन, पाण्याची पाइप लाइन, ऑप्टिकल फायबर केबल लाइन, रेल्वे लाइन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर सदर तत्वतः मान्यतेच्या पत्रातील पर्यायी वनीकरणाची रक्कम, नक्त वर्तमान मूल्य रक्कम (NPV), वन्यजीव संवर्धन आराखडा, औषधी वनस्पतीचे रोपवण इत्यादी कामाबाबत आवश्यक पूर्ण देय रक्कम (Compensatory levies) भरणा प्रकल्प यंत्रणेकडून केल्यानंतर तसेच आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी वनीकरणासाठीची वनेत्तर जमीन वन विभागाकडे हस्तांतरण (Transfer) व वन विभागाचे नावे (Mutation) झालेनंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू करून सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने प्रकल्पा अंतर्गत वन जमीनीवरील झाडे तोडण्यास तसेच काम सुरू करणेस परवानगी देणेसाठी संबंधित मुख्य वनसंरक्षक यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

प्रकल्प यंत्रणा, WRSR Power Transmission Ltd., Pune यांनी केंद्र शासनाचे तत्वतः मान्यता पत्रातील केंद्र शासनाचे पत्रातील अट क्र.१.२, १.३,१.६, ३.१ व ३.२ चे अनुषंगाने सर्व्हे सीमांकन, पर्यायी वनीकरण, नक्त वर्तमान मूल्य, औषधी वनस्पतीचे रोपवण वन्यजीव संवर्धन आराखडा ई. बाबी करीता रक्कम रु. ३०,६९,८८,१६८/- विहित मार्गे कॅम्पा सदरी जमा केलेली आहे. केंद्र शासनाचे दिनांक ७.०५.२०१५ व महाराष्ट्र शासनाकडील परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्रक्र-७७/फ-१०, दिनांक १.०७.२०१५ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून खालील अटींचे अधीन राहून प्रकल्प यंत्रणा, WRSR Power Transmission Ltd., Pune यांना खालीलप्रमाणे अनुसूची मध्ये नमूद वनक्षेत्रातील वृक्षतोड व ट्रान्समिशन लाईन टाकण्याचे काम सुरू करण्यासाठी खालील अटी व शर्तीचे अधीन राहून कार्यारंभ आदेश (Working Permission) देण्यात येत आहे.

1. प्रकल्प यंत्रणा वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाचे तत्वतः मान्यता आदेशातील सर्व शर्ती व अटींचे अनुपालन करेल.
2. खालीलप्रमाणे अनुसूची मध्ये नमूद वनक्षेत्रातील ट्रान्समिशन लाईन टाकण्याचे काम सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे काम करण्यात येऊ नये अन्यथा वनभंगाबाबत गुन्हा दाखल करण्यात येऊन काम करणेस दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
3. उपवनसंरक्षक सांगली व सातारा यांनी सदर प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे वृक्षतोड संबंधित परिक्षेत्र वन अधिकारी यांचे नियंत्रणाखाली तसेच आवश्यकतेनुसार लेखी पूर्वपरवानगी घेऊनच करण्यात यावी. सदर वृक्षतोड करताना केंद्र शासनाचे पत्रातील अट क्र.३.४ चे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.
4. **सांगली वन विभागातील वळतेकरण होणारे क्षेत्रापैकी १३.७३५० हे. क्षेत्र आटपाडी संवर्धन राखीव क्षेत्रामध्ये येत असल्याने सदर क्षेत्रामध्ये काम करत असताना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दिनांक १५.१२.२०२५ चे पत्रातील अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक असेल. तसेच सदर काम करत असताना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चा भंग होणार नाही याबाबत खबरदारी घेण्यात यावी.**
5. प्रकल्प यंत्रणा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दिनांक १५.१२.२०२५ चे पत्रातील सर्व शर्ती व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची उपवनसंरक्षक सांगली हे खात्री करतील व याबाबतचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करतील.
6. प्रकल्प यंत्रणा तत्वतः मान्यता आदेशातील सर्व शर्ती व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची उपवनसंरक्षक सांगली व सातारा हे खात्री करतील व याबाबतचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करतील.
7. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केलेले नियम, मार्गदर्शक सूचना व या आदेशातील तसेच केंद्र शासनाचे तत्वतः मान्यता आदेशातील अटीपैकी कोणत्याही अटीचे अनुपालन न करणे हे वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.
8. मजुरांचे वास्तव्यासाठी वनक्षेत्रात तात्पुरते शेड उभारता येणार नाही.
9. सदर आदेश केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सूचना क्र.११-३०६/२०१४-FC(pt) दिनांक २८.०८.२०१५ प्रमाणे १ वर्षापर्यंत वैध राहतील.
10. तत्वतः मान्यता आदेशातील अटींचा पूर्तता अहवाल संबंधित उपवनसंरक्षक यांचेमार्फत तात्काळ सादर करणेची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.
11. प्रकल्प यंत्रणेकडून वन्यजीव उपशमन योजना करीता उपवनसंरक्षक सांगली यांनी कळविलेनुसार रक्कम रु. १०४.०० लक्ष कॅम्पाचे खातेमध्ये जमा केली आहे. **तथापि केंद्र शासनाचे पत्रातील अट क्र.३.१ चे अनुषंगाने व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्रातील अट क्र.४ नुसार प्रकल्प यंत्रणा वन्यजीव उपशमन योजना (Wildlife Mitigation Plan) वन विभागाचे समन्वयाने**

तयार करून त्यास विहित मार्गे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची १५ दिवसात मान्यता घेऊन सादर करेल तसेच सदर वन्यजीव उपशमन योजणेकरीता अधिक रकमेची आवश्यकता असल्यास सदरची रक्कम प्रकल्प यंत्रणा कॅम्पाचे खात्यामध्ये तात्काळ जमा करेल अन्यथा सदर कार्यारंभ आदेश आपोआपच (deemed to be cancelled) रद्द होतील.

## अनुसूची

| Name of Village/Takuka | Forest Land Required | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Com. No | Sr. No. | Gat No. | Length (In Mtr) | Width (In Mtr) | Area in Sq Mtr | Area In Ha. | Legal Status |
| **Sangli Forest Division** | | | | | | | | |
| Jath, Tal- Jath | - | - | 4 | 53.6297 | 67 | 3593.19 | 0.3593 | Identified Forest |
| Jath, Tal- Jath | 267 | 29 | 32 | 252.2388 | 67 | 16900.00 | 1.6900 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 238 | 1296 | 105.6418 | 67 | 7078.00 | 0.7078 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 242 | 1334 | 333.9254 | 67 | 22373.00 | 2.2373 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 240 | 1298 | 122.000 | 67 | 8174.00 | 0.8174 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 255 | 1299 | 208.2985 | 67 | 13956.00 | 1.3956 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 243 | 1300 | 121.2388 | 67 | 8123.00 | 0.8123 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 234 | 1297 | 163.5970 | 67 | 10961.00 | 1.0961 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 233 | 1291/1 | 50.3284 | 67 | 3372.00 | 0.3372 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 244 | 1290 | 393.4627 | 67 | 26362.00 | 2.6362 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 251 | 1284 | 57.8806 | 67 | 3878.00 | 0.3878 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 252 | 1283 | 203.8358 | 67 | 13657.00 | 1.3657 | R.F. |
| Walekhindi Tal-Jath | 246 | 227 | 1278/1/1 | 18.8657 | 67 | 1264.00 | 0.1264 | R.F. |
| Bevnur Tal-Jath | 248 | 212 | 923 | 104.4179 | 67 | 6996.00 | 0.6996 | R.F. |
| Atapadi Tal-Atapadi | 200 | 910 | 3276 | 848.6716 | 67 | 56861.00 | 5.6861 | R.F. |
| Atapadi Tal-Atapadi | 200 | 917 | 3277 | 514.9552 | 67 | 34502.00 | 3.4502 | R.F. |
| Atapadi Tal-Atapadi | 200 | 920 | 3407 | 685.4478 | 67 | 45925.00 | 4.5925 | R.F. |
| Atapadi Tal-Atapadi | 200 | 919 | 3406 | 0.9254 | 67 | 62.00 | 0.0062 | R.F. |
| Mudhewadi Tal- Atapadi | 201 | 953 | 249 | 503.0149 | 67 | 33702.00 | 3.3702 | U.F. |
| | 201 | 952 | 250 | 451.9104 | 67 | 30278.00 | 3.0278 | U.F. |
| | | | | | | **Total** | **34.8017** | |

| Satara Forest Division | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Jaoli tal-Phaltan | 770 | 16 | 42 | 1175.2395 | 67 | 78741 | 7.8741 | R.F. |
| Bangarwadi , Tal Dahiwadi | 849 | 65 | 424 | 79.35 | 67 | 5316.65 | 0.5316 | R.F. |
| Wavarhire Tal-Dahiwadi | 889 | 304 | 295 | 547.65 | 67 | 36692.55 | 3.6693 | R.F. |
| Rajwadi Tal-Dahiwadi | 879 | 146 | 268 | 173.65 | 67 | 11634.55 | 1.1635 | R.F. |
| Hastanpur ( Gherewadi) Tal- Dahiwadi | 879 | 69 | 195A | 572.94 | 67 | 38386.98 | 3.8387 | R.F. |
| Shenwadi, Tal-Dahiwadi | 847 | 175 | 797 | 1160.25 | 67 | 77736.75 | 7.7737 | R.F. |
| Kalchoundi, Tal- Dahiwadi | 847 | 28 | 157 | 13.582 | 67 | 909.994 | 0.0910 | R.F. |
| Kalchoundi, Tal- Dahiwadi | 847 | 28 | 157 | 285.3731 | 67 | 19119.9977 | 1.9120 | R.F. |
| Ranand, Tal-Dahiwadi | 887 | 207A | 1188 | 950.70 | 67 | 63693.9 | 6.3694 | R.F. |
| **Total** | | | | | | | **33.2233** | |
| **Total Area required in (ha)** | | | | | | | **68.0250** | |

(जी. गुरुप्रसाद)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

**प्रति,**

Authorised Signatory,
WRSR Power Transmission Ltd., Pune

**प्रतिलिपी :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रतिलिपी :** वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/- सदर प्रस्तावामध्ये अंतर्भूत उपवनसंरक्षक (प्रा.), पुणे यांचेकडील ९.२५९२ हे. क्षेत्र आपले कार्यक्षेत्रामध्ये येत असल्याने सदर क्षेत्रावरील काम सुरु करणे संदर्भातील आदेश आपले स्तरावरून देण्यात यावे.

**प्रतिलिपी :** सहसचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रतिलिपी :** जिल्हाधिकारी सांगली/सातारा यांना माहितीसाठी.

**प्रतिलिपी :** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली/सातारा यांना माहितीसाठी

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक सांगली/सातारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

तत्वतः मान्यता आदेश व काम सुरू करण्यास परवानगी देण्याबाबतचे मराठी व इंग्रजी भाषेतील आदेश जनतेच्या माहितीसाठी वन विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावेत.

जिल्हाधिकारी सांगली/सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली/सातारा व उपवनसंरक्षक सांगली/सातारा यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था,पंचायत,नगरपालिका,नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

Authorised Signatory, WRSR Power Transmission Ltd., Pune यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुरीचे आदेश सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक त्यांचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा ई. आणि केंद्र शासनाने तत्वतः मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व शर्ती यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत आणि त्याची प्रत उपवनसंरक्षक सांगली/सातारा व मुख्य वनसंरक्षक (प्रा), कोल्हापूर यांना देण्यात यावी.

स्थानिक स्वराज्य संस्था,पंचायत,नगरपालिका,नगरपरिषद,संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांनी आदेशाची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

(जी. गुरुप्रसाद) /5/1/26

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**

**कोल्हापूर.**